UNIVERSITY OF CAMBRIDGE INTERNATIONAL EXAMINATIONS
General Certificate of Education Advanced Level

**MARATHI** **9688/04**

Paper 4 Texts **October/November 2010**

**2 hours 30 minutes**

Additional Materials: Answer Booklet/Paper

*2718493520*

**READ THESE INSTRUCTIONS FIRST**

If you have been given an Answer Booklet, follow the instructions on the front cover of the Booklet.
Write your Centre number, candidate number and name on all the work you hand in.
Write in dark blue or black pen.
Do not use staples, paper clips, highlighters, glue or correction fluid.

Answer any **three** questions, each on a different text. You must choose one question from Section 1, one from Section 2 and one other.
Write your answers in **Marathi** on the separate Answer Paper provided.
Dictionaries are **not** permitted.
You should write between 500 and 600 words for each answer.
Set texts may **not** be taken into the examination room.
You are advised to divide your time equally between your answers.

At the end of the examination, fasten all your work securely together.
All questions in this paper carry equal marks.

**सर्व प्रथम खालील सूचना वाचा.**

तुम्हाला उत्तरपुस्तिका दिली असल्यास तिच्या मुखपृष्ठावरील सूचनांचे पालन करा.
उत्तरपुस्तिका व पूरक उत्तरपृष्ठांवर तुमचा परीक्षा केंद्र क्रमांक, अनुक्रमांक (रोल नंबर) व तुमचे नाव लिहा.
गडद निळ्या अथवा काळ्या शाईच्या लेखणीने लिहावे.
टाचणी अथवा टाचण्याची कोणतीही अन्य साधने, वाक्यांना अधोरेखित करण्यासाठी रंगीत लेखणीचा वापर,
डिंक किंवा चूक मजकूर खोडण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या शाईचा वापर करू नये.

कोणतेही **तीन** प्रश्न सोडवा. प्रत्येक प्रश्न हा वेगवेगळ्या पाठ्यपुस्तकांवर आधारीत असावा. विभाग 1 मधून **एक** प्रश्न,
विभाग 2 मधून **एक** प्रश्न व उरलेला **एक** प्रश्न कोणत्याही विभागातून सोडवा.
उत्तर लिहिण्यासाठी देण्यात आलेल्या वेगळ्या पृष्ठांवर प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.
शब्दकोषांचा उपयोग करण्यास मनाई आहे.
प्रत्येक उत्तर 500 ते 600 शब्दांच्या मर्यादेत असावे.
प्रस्तावना, संदर्भ, टीपा व अर्थाचे स्पष्टीकरण असलेले पाठ्यपुस्तक परीक्षेच्या खोलीत नेता येणार नाही.
सर्व उत्तरांना समान वेळ द्यावा.

परीक्षेच्या शेवटी उत्तरांची सर्व पृष्ठे व्यवस्थित बांधावीत.
सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

This document consists of **5** printed pages and **3** blank pages.


© UCLES 2010
UNIVERSITY *of* CAMBRIDGE
International Examinations

**[Turn over**

WWW.XTREMEPAPERS.NET

## विभाग – 1

**1 संत ज्ञानेश्वर - सार्थ ज्ञानेश्वरी - अध्याय २ रा.**

**(ओवी क्रमांक १ ते ५)**

मग संजयो म्हणे रायातें । आईकें तो पार्थु तेथें ।
शोकाकुल रूदनातें । करितसे ॥
तें कुळ देखोनि समस्त । स्नेह उपनलें अद्‌भुत ।
तेणें द्रवलें असे चित्त । कवणेपरि ॥
जैसे लवण जळें झळंबलें । ना तरी अभ्र वातें हाले ।
तैसें सधीर परी विरमलें । हृदय तयाचें ॥
म्हणोनि कृपा आकळिला । दिसतसे अति कोमाइला ।
जैसा कर्दमीं रुपला । राजहंस ॥
तयापरी तो पांडुकुमरु । महामोहें अति जर्जरु ।
देखोनि श्रीशाङ्‌र्गधरु । काय बोले ॥

**(अ)** **(i)** संजयने अर्जुनाच्या मन:स्थितीचे वर्णन धृतराष्ट्रापाशी कोणत्या शब्दात व्यक्त केले ते सविस्तरपणे लिहा.

**(ii)** श्रीकृष्णाने अर्जुनाचे सांत्वन करताना अर्जुनाचा मोठेपणा कशा प्रकारे वर्णन केला ते विस्तारपूर्वक लिहा.

**(iii)** युद्ध प्रसंगी अर्जुनाचे वागणे पाहून श्रीकृष्णाला आश्चर्य का वाटले ? [25]

**अथवा**

**(ब)** तुम्ही अभ्यासिलेल्या ओव्यांतून अर्जुनाचे म्हणणे योग्य की अयोग्य हे सांगून सविस्तर चर्चा करा. [25]

© UCLES 2010

WWW.XTREMEPAPERS.NET

**2 संत तुकाराम-सार्थ श्री तुकारामाची गाथा.**

**(अभंग क्रमांक २७५२ व २७५३)**

क्षोभ आणि कृपा मातेची समान । विभाग जतन करुनि ठेवी ॥
क्षणभंगुर ते उपजली चिंता । खरी अखंडता आवडीची ॥
सिकवूं जाणे तें गोमठियासाठीं । लोभे नाहीं तुटी निश्चयेसी ॥
अवघेंचि मिथ्या समया आरतें । देतां तो उचितें काळ जाणे ॥
न करी अव्हेर नेदी गांजूं कोणा । भेडसावी तान्हे बाऊ आला ॥
तुका म्हणे करी जिवाची जतन । दचकूनि मन जवळी आणी ॥

संसाराचे धांवे वेठी । आवडी पोटीं केवढी ॥
हागों जाता दगड सांची । अंतरींही संकल्प ॥
लाज तेवढी नारायणीं । वांकडी वाडी पोरांपें ॥
तुका म्हणे बेशरमा । श्रमावरी पडिभरू ॥

**(अ)** (i) आईचे मोठेपण तुकारामाने कोणत्या शब्दात सांगितले ते विस्ताराने लिहा.

(ii) तुकाराम विठ्ठलाला आईच्या स्वरूपात का पाहतात ?

(iii) तुकारामाच्या शैलीवर प्रकाश टाका. [25]

**अथवा**

**(ब)** तुम्ही अभ्यासिलेल्या अभंगांतून तुकारामाने समाजातल्या कोणकोणत्या रूढींवर टीका केली ते सविस्तरपणे विशद करा. [25]



WWW.XTREMEPAPERS.NET

**3 गोविंदाग्रज - फणसाचे पान - कविता - गोफ**

थांब, उलगडू गोफ कठिण हा शान्त बुद्धिने सखे असा –
की न तुटावा पदर एकही, धागा नीट तसा
ना तरि होइल हानि अपुली आणि जयाचे हसे तसे
एक्या ठायी आलो का वद दूर व्हावया सखे असे

कठिण असे, तरि उलगडणे हा गोफ असे आता भाग
ना तरि त्याचा पीळ राहुनी छळील तो जागोजाग
मनापासुनी जे केले, जे मान्य जिवांनाही झाले
विमनस्कपणे परी आज ते निस्तरणे नशिबी आले

कठिण जोडणे, परी तोडणे सुकर वाटते जनांप्रती
उलटा अनुभव आला आम्हा, गुंग जाहली इथे मती

★

खेळता गुंफिला गोफ, जीव त्यालागि वाहिला
'गोविंदाग्रज' सांगेना – की त्याचा पीळ राहिला.

**(अ) (i)** गोफ हे कशाचे प्रतीक आहे ? समजाऊन सांगा.

**(ii)** 'थांब उलगडू गोफ कठिण हा शान्त बुद्धिने सखे असा –' असे कवीला का म्हणावेसे वाटले ?

**(iii)** प्रेम जोडण्या इतकेच तोडणे कठीण हा भाव गोफ कवितेतून कसा प्रगट झाला आहे ? [25]

**अथवा**

**(ब)** 'अवेळी ओरडणाऱ्या कोकिळेस' या कवितेची मध्यवर्ती कल्पना स्पष्ट करून कवितेचे रसग्रहण करा. [25]



WWW.XTREMEPAPERS.NET

## विभाग – 2

4 **अशोक पाटोळे-नाटक-आई रिटायर होतेय.**

**(अ)** ‘आई रिटायर होतेय’ या नाटकातील विषयाची आजच्या काळातील प्रासंगिकता स्पष्ट करा. [25]

**अथवा**

**(ब)** आईच्या रिटायर होण्याला कोण कारणीभूत ठरले ? चर्चा करा. [25]

5 **आशा बगे - कथासंग्रह - मारवा.**

**(अ)** ‘रंग’ या कथेतील मानसीच्या मनातील संघर्षावर प्रकाश टाका. [25]

**अथवा**

**(ब)** कथा लेखिका म्हणून आशा बगेच्या कथांतील गुणदोषांवर चर्चा करा. [25]

6 **हरी नारायण आपटे – कांदबरी - गड आला पण सिंह गेला.**

**(अ)** कमलकुमारीवर आलेल्या संकटांचे सविस्तर वर्णन करा. [25]

**अथवा**

**(ब)** तानाजीचे स्वभावचित्रण करा. [25]

© UCLES 2010

WWW.XTREMEPAPERS.NET

**BLANK PAGE**



WWW.XTREMEPAPERS.NET

**BLANK PAGE**

© UCLES 2010

WWW.XTREMEPAPERS.NET

**BLANK PAGE**

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

University of Cambridge International Examinations is part of the Cambridge Assessment Group. Cambridge Assessment is the brand name of University of Cambridge Local Examinations Syndicate (UCLES), which is itself a department of the University of Cambridge.

© UCLES 2010



WWW.XTREMEPAPERS.NET